प्रकरण : पाचवे

# उपसंहार

# उपसंहार

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. भारतात नवसमाजनिर्मितीचे मुलभूत स्वरूपाचे कार्य करत असताना त्यांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय अशा सर्व अंगांना स्पर्श करणारे अनेक धाडसी निर्णय घेऊन क्रांतीकारक कार्य केले.

हे कार्य करत असताना त्याकाळातील अस्तित्त्वात असलेले धार्मिक रूढी, प्रथा, परंपरा, ब्राम्हणी वर्चस्व, वर्णव्यवस्था आणि जाती व्यवस्थेवर आधारित असलेल्या विषमतेविरूद्ध त्यांनी कायदे करून प्रस्थापित व्यवस्थेला सुरूंग लावला. यासाठी शाहूंनी आपल्या संस्थानात जनजागृतीचे कार्य तर केलेच शिवाय शैक्षणिक संस्था, वसतिगृहे या माध्यमातून शैक्षणिक सुधारणा केल्या. शेती, पाणीपूरवठा, बाजारपेठा इत्यादी साठी आवश्यक उपाययोजना करून त्यामाध्यमातून आर्थिक विकास घडवून आणला. प्रशासनावरती निर्माण झालेले उच्चवर्णीयांचे वर्चस्व झुगारून देऊन प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या. सामान्य माणसासाठी प्रशासनाचा दरवाजा खुला केला. प्रशासनात विविधांगी सुधारणा घडवून आणल्या. या विविध सुधारणांच्या व कार्याच्या माध्यमातून त्यांनी आपल्या प्रशासनात अमूलाग्र बदल घडवून आणले.

वयाच्या २० व्या वर्षी २ एप्रिल १८९४ च्या राज्यारोहण समारंभानंतर कोल्हापूर संस्थानची अधिकारसूत्रे शाहू छत्रपतींच्या हाती आली. छत्रपतींना आपल्या पहिल्याच जाहीरनाम्यात कल्याणकारी राज्यकारभाराची ग्वाही देणारा आपला मनोदय स्पष्ट केला होता.

राज्यातील बहुसंख्य जनता समाजातील मूठभर उच्चवर्णीयांच्या अन्यायाखाली भरडली जात आहे हे शाहूंनी ओळखले होते. शाहूंना या जनतेची पिळवणूक थांबवायची होती. त्यांच्या प्रशासनाचे उद्दिष्ट सामान्य माणसाच्या

अडी-अडीचणी आणि त्यांच्या संकटाच्या निवारणामध्ये होते.

महाराजांना समाजातील जातीव्यवस्थेचे समूळ उच्चाटन करावयाचे होते. त्यासाठी त्यांनी विविध कायदे केले. तत्कालीन ब्रिटिश कायद्यांचा आधार घेऊन भारतीय सामाजिकतेच्या संदर्भात, सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात योग्य दिशेने प्रशासकीय कारभार चालू ठेवला.

समाजातील प्रस्थापित उच्चवर्गीय समाज सत्तेच्या अधिकारांच्या जोरावर सामान्य माणसांची लूट करत होता. अशा लालची प्रवृत्तीच्या लोकांना प्रतिबंध घालण्यासाठी शाहूंनी विविध आदेश काढले. कायद्याद्वारे तसेच विविध खाती निर्माण करून या लोकांवर बचक बसविण्यासाठी शाहूंनी आद्यादेश काढले.

छत्रपती शाहू महाराज यांनी प्रशासनातील कर्मचाऱ्यांमध्ये शिस्तीचे पालन करण्यासाठी अनेक कायदे संमत केले. कर्मचाऱ्यांची भरती, पदोन्नती, बढती, प्रशासकीय भाषा, वक्तशीरपणा इ. संबंधी नियम तयार केले.

अशा प्रशासकीय सुधारणांचा आढावा प्रस्तूत शोधप्रबंधात घेण्यात आला आहे.

पहिल्या **'जीवन-परिचय'** या प्रकरणामध्ये एका संस्थानचा राजा-राज्यकर्ता व आदर्श प्रशासक या दृष्टीकोनातून छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनकार्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

सुरूवातीला कोल्हापूरच्या गादीची ऐतिहासिक पाश्वभूमी विशद करण्यात आली आहे. त्यामाध्यमातून छत्रपती शाहूचा कोल्हापूर राजघराण्याशी संबंध कसा प्रस्थापित झाला व शाहू महाराज छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज कसे ठरतात हे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानंतर छत्रपती शाहूंचा जन्म, शिक्षण, विवाह, अधिकारप्राप्ती इ. यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

छत्रपती शाहू महाराज हे क्रांतीकारक राजे का ठरले. शाहूंच्या विचारांची बैठक कशी पक्की झाली. या बाबी समजावून घेण्यासाठी छत्रपती शाहूंवर पडलेल्या विविध प्रभावाचा आढावा याठिकाणी घेण्यात आला आहे.

घराण्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, विशिष्ट कुळात त्यांचा झालेला जन्म, शिक्षण, त्यांची जडणघडण ज्या वातावरणात झाली ते वातावरण इ.चा मोठा प्रभाव असल्याने या बाबींची दखल या प्रकरणात घेण्यात आली आहे.

छत्रपती शाहूंच्या हातून सामाजिक कार्य झाले त्यामध्ये शिवछत्रपतींच्या कार्याची ऐतिहाकि पार्श्वभूमी, आर्यसमाज सत्यशोधक समाज या विविध समाजाचा प्रभाव त्यांच्यावर होता असे लक्षात येते. शिक्षण घेत असताना उदारमतवादी व कर्तव्यनिष्ठ प्रशिक्षक फ्रेझर यांनी शाहूंना दिलेले शिक्षण, सबनीसांसारख्या गुरूंची शाहूंना जीवनाखेर लाभलेली साथ इत्यादीचाही मोठा प्रभाव होता. देश विदेशातील पर्यटनामुळे शाहूंची दृष्टी विशाल झाली. पाश्चिमात्य लोकशाही उदारमतवादी दृष्टीकोनाचा त्यांच्यावर मोठा प्रभाव पडला त्यामुळे शाहू लोकशाहीवादी बनले होते. त्यामुळे अशा विविध घटकांचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

शाहूंनी विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांना विविध पदव्यांनी सन्मानित करण्यात आले होते. त्याची दखल घेऊन पहिल्या प्रकरणाचा समारोप करण्यात आलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये **'शाहूंची राजकीय व शैक्षणिक विचारसरणी'** स्पष्ट करण्यात आलेली आहे. छत्रपती शाहूंनी राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतल्यानंतर संस्थांनामध्ये निर्माण झालेले ब्राम्हणी वर्चस्व, वर्णद्वेषी व्यवहार आणि जातीयता या बाबींचा शाहूंच्या मनावर गंभीर परिणाम झाला. हि व्यवस्था मोडून त्यांना प्रशासकीय व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणावे लागले. त्यामध्ये प्रामुख्याने उच्चवर्गीयांची प्रशासनात असलेली मक्तेदारी त्यांनी शासकीय आदेशाद्वारे मोडून काढली.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

भारतीय सामाजिक परिस्थितीमध्ये बहुजन समाजातील सामान्य लोकांची उपेक्षा होते याची शाहूंना जाणीव होती. महाराजांना या बहुजन समाजातील लोकांचा उद्धार करावयचा होता. 'सामान्य माणसाचा उद्धार हा फक्त ब्रिटिश राजवटीच होऊ शकतो अशी महाराजांची खात्री होती.'

बहुजन समाजाच्या हक्कांचे वरिष्ठ वर्गापासून संरक्षण करणारी एक दैवी शक्तीची योजना म्हणून महाराज ब्रिटिश शासनाकडे पाहत होते. ब्रिटिश शासनाच्या मदतीने बहुजन समाजाचा उद्धार करता येईल याची महाराजांना खात्री होती. त्यामुळे महाराजांच्या ब्रिटिश साम्राज्याविषयी विचाराचा आढावा या ठिकाणी घेण्यात आला आहे.

महाराजांच्या दृष्टीतील स्वराज्य म्हणजे जनतेच्या पात्रतेतून व तिला वापरता येईल ते राज्य होय त्यामुळे सर्वांना समदृष्टीने पाहणाऱ्या ब्रिटिश सत्तेकडून अधिकार सुत्रे काढून घेऊन ती मुठभर पांढरपेश्या समाजाकडे देणे महाराजांना पसंद नव्हते. त्यामुळे महाराजांचे स्वराज्य विषयक विचार स्पष्ट करण्यात आले आहेत.

शाहूंची स्वराज्याची संकल्पना संकुचित नव्हती. त्यांना समाजातील मागास व दलित वर्गांना त्यांच्या अधिकारांविषयी, कर्तव्याविषयी जागृत करून राज्यकारभारात वाटा मिळवून द्यावयाचा होता. त्यामुळे शाहूंची स्वराज्यविषयक भूमिका या प्रकरणात स्पष्ट करण्यात आली आहे.

शिक्षण हि सर्व सुधारणांची गुरुकिल्ली आहे अशी शाहूंची पक्की खात्री होती. शाहूंना प्रशासनात सुधारणा करावयाच्या होत्या त्यासाठी संस्थानातील जनता सर्व प्रथम शिक्षित होणे आवश्यक वाटत होते.

शिक्षणाच्या माध्यमातून जनतेची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रगती साधता येईल अशी शाहूंची खात्री होती. शिवाय प्रशासनात महाराजांना सुधारणा करावयाच्या होत्या त्यासाठी देखिल महाराजांना शिक्षण महत्त्वाचे वाटत होते. त्यामुळे

त्यांनी आपल्या सर्व कार्यामध्ये शिक्षण प्रसाराच्या कार्यास प्राधान्य दिले होते. त्यामुळे शाहूंची शैक्षणिक विचारसरणी याठिकाणी स्पष्ट करण्यात आली आहे.

महाराजांच्या मते, शिक्षण ही एक फार मोठी शक्ती आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची, गुलामगिरीची जाणीव होते. त्यामुळे हा अन्याय हि गुलामगिरी उलथवून टाकण्यासाठी व्यक्ती सक्षम बनण्यासाठी तिला शिक्षण दिले पाहिजे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये आत्मविश्वास, आत्मतेज, स्वाभिमान निर्माण होऊ शकतो हे शाहूंनी ओळखले होते. म्हणूनच समाजातील सामान्य माणसाचा उद्धार करण्यासाठी समाजातील सर्व थरांतील लोकापर्यंत शिक्षण पोहचावे यासाठी शाहूंनी प्रयत्न केले.

प्रकरण तीनमध्ये **'शाहूंची प्रशासकीय कार्यपद्धती'** स्पष्ट करण्यात आली आहे. शाहूंच्या कार्याची मध्यवर्ती बैठक सामान्य माणसाच्या उत्थापनामध्ये होती. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' असा कल्याणकारी राज्यकारभार करून प्रशासनाचा एक आदर्श त्यांनी लोकांसमोर ठेवला.

उदा. प्रशासनामध्ये उच्चवर्णीयांच्या मक्तेदारीमुळे सामान्य माणसांच्यावर होणारा जुलूम दूर व्हावा यासाठी प्रयत्न केले समाजातील प्रस्थापितांच्या बाजूने राज्यकारभाराची दिशा न ठेवता सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून राज्यकारभार केला. वेळ, काळ, परिस्थिती यांचे भान राखून प्रशासन केले इ.

आधुनिक काळात प्रशासनाची एक आदर्शपद्धती म्हणून लोकशाही शासन व्यवस्थेकडे पाहिले जाते. परंतु स्वातंत्र्याच्या ५० वर्षापुर्वी छत्रपती शाहू महाराज यांनी लोकशाही शासनपद्धतीशी अनुरूप असे कार्य केले होते. त्यांनी आपल्या संस्थानात लोकशाही शासन प्रणालीशी अनुरूप असे कार्य केले त्याचा थोडक्यात आढावा लोकशाहीचे संकल्पक छत्रपती शाहू मुद्याच्या आधारे घेण्यात आला आहे.

चौथ्या प्रकरणात छत्रपती **'शाहू महाराज यांनी प्रशासनात सुधारणा'** घडवून आणल्या त्यांचा आढावा घेण्यात आला आहे. त्यासाठी सर्वप्रथम

कोल्हापूर संस्थानच्या स्थापनेपासून छत्रपती शाहू महाराज यांच्या हाती राज्यकारभाराची सुत्रे येईपर्यंत कोल्हापूर प्रशासनामध्ये विविध टप्प्यावर जे बदल घडत गेले ते स्पष्ट करण्यात आले आहेत.

त्यामध्ये १७०८ ते १८४४ मधील प्रशासनाची परंपरागत पद्धती, १८४४ ते १८९४ ब्रिटिश पोलिटिकल एजंटच्या प्रभावाखालील ब्रिटिश शासन पद्धती, १८९४ ते १९२२ पर्यंतचे छत्रपती शाहू महाराजांचे प्रत्यक्ष प्रशासन असे टप्पे करण्यात आले आहेत.

छत्रपती शाहूंच्या प्रशासकीय सुधारणांचा आढावा घेताना असे लक्षात येते की, उच्चवर्णियांची प्रशासनात असलेली मक्तेदारी त्यांनी शासकीय आदेशाद्वारे मोडून काढली. विविध खात्यांचा विस्तार केला. त्यामाध्यमातून प्रशासनावर वचक बसविण्याचा प्रयत्न केला. ब्राम्हणेत्तर बहुजन समाजातील अनेक उच्चशिक्षित व प्रशिक्षित तज्ञ व्यक्तींच्या प्रशासनातील विविध पदांवर नेमणूका केल्या. हे करत असताना प्रस्थापितांनी शाहूंना सर्वशक्तीनिशी विरोध करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय पातळीवरील लोकमान्य टिळकांसारख्या महनीय नेत्यांनीदेखील विरोधाचा पवित्रा घेतला होता. परंतु शाहूंनी केलेल्या जनजागृतीमुळे आणि सर्वसामान्य जनतेच्या रेटयामुळे तसेच लोकचळवळीमुळे प्रस्थापितांचे मनसुबे यशस्वी होऊ शकले नाहीत.

छत्रपती शाहू महाराजांनी उच्चपदस्थ ब्राम्हण अधिकारी आणि ब्राम्हणी व्यवस्था यांच्या समांतर अशी ब्राम्हणेत्तर उच्चपदस्थांची आणि ब्राम्हणेत्तर बहुजनांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या धार्मिक, शैक्षणिक आणि सामाजिक संस्था स्थापून सामान्य जनतेला ब्राम्हणी व्यवस्थेच्या गुलामगिरीच्या जुलमी जोखडातून मुक्त केले. हे करत असताना महाराजांनी प्रशासनात विविध सुधारणा घडवून आणल्या त्यांचा आढावा याठिकाणी घेण्यात आला आहे.

जसे संस्थानच्या प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या बेपर्वा, उद्दाम प्रवृतींना आळा घालण्यासाठी व त्यांच्या अधिकार कक्षेची मर्यादा त्यांना दाखवून देण्यासाठी तसेच आपण स्वतः संस्थानची सर्वोच्च अंतिम सत्ता आहोत हे सर्वांना जाणवून देण्यासाठी शाहूंनी अवलंबिलेली प्रत्यक्ष प्रशासन पद्धती, प्रशासनावर मजबूत पकड निर्माण करण्यासाठी निर्माण केलेले 'हुजुर ऑफिस', सामान्य माणसाची प्रशासनात होणारी लूट थांबविण्यासाठी फिरतीवरील अधिकाऱ्यांवर लादलेले निर्बंध, सामान्य माणसांच्या अडी अडचणी, प्रश्न समजावून घेण्यासाठी अवलंबिलेली प्रत्यक्ष भेटीची पद्धती, विविध तहान्वये लादलेले निर्बंध रद्द करून ब्रिटिश शासनाकडून मिळवलेले जादाचे अधिकार, संस्थानच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक बदलासाठी राबविलेले नवीन प्रकल्प व योजना, प्रशासनामध्ये ब्राम्हणेत्तरांची केलेली नेमणूक, परंपरागत कुलकर्णी वतनाची बरखास्ती आणि पगारी तलाठयाची केलेली नेमणूक, पाटील दरबार स्कूलची निर्मिती करून पाटलांना सरकारी कामात हुशार करण्यासाठी केलेले प्रयत्न,मागासलेल्या समाजाला प्रगत समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ठेवलेले आरक्षण, प्रशासकीय सोयीसाठी नवीन महालांची केलेली निर्मिती, सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त, कार्यक्षमता निर्माण व्हावी यासाठी लादलेले निर्बंध, प्रशासकीय भाषेसंबंधातील तरतूद आणि निवृत्तीनंतर मिळणाऱ्या पेन्शन संदर्भातील आदेश यांचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

शाहू महाराजांची एकंदरीत विचारप्रणाली पाहता शाहू महाराज हे सृजनशील, मानवतावादी होते. सर्व प्रकारच्या शोषणातून मानवाची मुक्ती व्हावी हा त्यांच्या सर्वसामान्य विचार असला तरी भारताला ब्रिटिश साम्राज्यातून जशी मुक्ती हवी होती. तशीच भारतीय समाजातील धनदांडग्यांच्या शोषणातून बहुजन समाजाची मुक्ती व्हावी यासाठी शाहूंनी कार्य केले.

शेतकरी, कामगार वर्ग आणि कष्टकऱ्यांच्या मुक्तीचा विचारही शाहू महाराजांनी आपल्या चळवळीचे लक्ष केले होते. अस्पृश्य वर्गाच्या मुक्ततेचा विचारदेखील

शाहू महाराजांनी प्रमुख मानला होता. त्यासाठी त्यांनी सामाजिक पातळीवर असंख्य सुधारणा घडवून आणल्या.

विसाव्या शतकाच्या पहिल्या आणि दुसऱ्या दशकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला पोषक ठरणारे सर्व प्रकारचे साह्य करण्याचे औदार्य शाहू महाराजांनी दाखविले होते. मानवमुक्तीसाठी मानवी मूल्यांचा विकास होऊन सामाजिक समता प्रस्थापित व्हावी, माणसांची मने उन्नत करण्यासाठी शाहू महाराजांनी आटोकाट प्रयत्न केले. शाहू महाराजांचे कार्य आणि विचारप्रणाली भावी पिढयांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरू शकते.

# संदर्भ ग्रंथ सूची

## संदर्भ ग्रंथ सूची :

---

### प्राथमिक साधन सामुग्री :


१. Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-II (1894-1900 A.D.), (Early Administrative Reforms), Shivaji University, Kolhapur 1983
Edited By : Sangave Vilas and Khane B.D.

२. Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol-IV (1900-1905 A.D.), (New Government Policies) Shivaji University, Kolhapur 1988
Edited By : Sangave Vilas and Khane B.D

३. Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-V (1906-1909 A.D.), (Foundation of Development Project and Rise of Sedition), Shivaji University, Kolhapur,1992
Edited By : Sangave Vilas

४. Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-VI (1910-1913A.D.), (Initiation of Socio-Economic Movements) Shivaji University, Kolhapur 1994.
Edited By : Sangave Vilas

५. Rajarshi Shahu Chhatrapati PapersVol- VII(1914-1917A.D.), (Implementation of Socio- Political Scheme) University, Kolhapur 1997
Edited By : Sangave Vilas

६. Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vo-III (1918-1919A.D.), (Impetus to social Legislation and Non-Brahmin Movement) Shivaji University, Kolhapur 2001
Edited By : Sangave Vilas

७. लट्ठे आ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र,बा.ल. पाटील, कोल्हापूर,१९२५

## दुय्यम साधन सामुग्री :


| | | | |
|---|---|---|---|
| १. | सुर्यवंशी कृ.गो. | - | राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ |
| २. | नाईक तु.बा. | - | छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ |
| ३. | धाटावकर भास्कर | - | राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश - भाग १ ला, पुरालेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई १९८८ |
| ४. | जामखेडकर अ.प्र. | - | रा.शाहू छत्रपतींचे निवडक आदेश-भाग २ रा, पुरालेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई १९८९ |
| ५. | भोसले एस.एस. | - | चंदनार्थे राजर्षी शाहू जन्म शताब्दी, स्मरणिका १९७४- ७५ कोल्हापूर जिल्हा परिषद मे १९७५ |
| ६. | जाधव भ.बा. | - | राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर,पहिली आवृत्ती, १९७१ |
| ७. | येडेकर शाम | - | राजर्षी एक व्यक्तीदर्शन, सतीशचंद्र येडेकर कोल्हापूर, विभाग तिसरा |
| ८. | कीर धनंजय | - | प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती, श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला, पुष्प पहिले, मार्च १९७०, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |
| ९. | साळुंखे पी.बी. | - | राजर्षी शाहू गौरव ग्रंथ,महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय मुबंई १९७६ |
| १०. | कीर धनंजय | - | राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतीकारक राजा,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१ |
| ११. | बागल माधवराव | - | राजर्षी छत्रपती श्री शाहू महाराज यांच्या आठवणी, माधवराव बागल, कोल्हापूर, १९५० |
| १२. | पवार जयसिंगराव | - | राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर द्वितीय आवृत्ती, २००७, |
| १३. | गर्गे स.मा. | - | करवीर रियासत, गो.ये.राणे प्रकाशन, पुणे, जुन १९८० |
| १४. | बागल माधवराव | - | बहुजन समाजाचे शिल्पकार, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९६६ |

१५. साळुंखे हिंदूराव - छत्रपती शाहू स्मृतिदर्शन, महाराष्ट्र ग्रंथ भंडार, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, जून १९९८

१६. जाधव रमेश - लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, ऑगस्ट १९९७,

१७. कराडे जगनाथ - आरक्षण ः धोरण आणि वास्तव सुगावा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती २००५

१८. भगत रा.तु. - शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९९९

१९. तोफखाने वा.द. - राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर प्रथम आवृत्ती १९६३.